# महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग,

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**

**क्रिडा स्पर्धा सन २०१७-१८**

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे- ४११०११.

ई-मेल : edmkvdc_pune@wrd.maharashtra.gov.in, दूरध्वनी : ०२०-२६१३५२६३.

sesipcsatara@rediffmail.com, sipcsports@gmail.com दूरध्वनी : ०२१६२-२४४६५४.


सिंचनात् राष्ट्रोद्धार:

## जलसंपदा विभाग, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम -2017-18

**स्थळ : शाहू क्रिडा संकुल, एस.टी.स्टँड शेजारी सातारा.**

## खेळाडूचे / संघाचे आचरण

**प्रत्येक स्पर्धक / संघ यांचेसाठी**

१. सर्व खेळाडुंनी आवेदन पत्र दिल्यानंतरच स्पर्धेमध्ये भाग घेण्यास परवानगी मिळेल.

२. प्रत्येक स्पर्धकाने जलसंपदा विभागाचे ओळखपत्र सादर केल्याशिवाय स्पर्धेत सहभाग दिला जाणार नाही.

३. सामन्यांचे वेळापत्रक वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. प्रत्येक स्पर्धेसाठी नेमून दिलेल्या वेळेतच स्पर्धकाने / संघाने उपस्थित राहणे बंधनकारक असेल. तीन वेळा पुकारा केल्यानंतर स्पर्धक उपस्थित न राहिल्यास उपस्थित स्पर्धकास / संघास पुढे चाल देण्यात येईल.

४. प्रत्येक खेळाडूने त्याच्या संघाच्या कर्णधारामार्फतच पंचाशी बोलावे.

५. खेळाचे सर्व नियमांची माहिती संबंधित खेळाडू / संघ यांना असणे आवश्यक आहे.

६. प्रत्येक खेळाडूस 2 पेक्षा अधिक क्रिडा प्रकारात सहभाग नोंदवता येणार नाही. खेळाडूनी त्याच्या संघाव्यतिरिक्त इतर संघात खेळता येणार नाही.

७. विरोधी खेळाडूस / संघास अपशब्द बोलणे किंवा शिवीगाळ तसेच अभद्र व्यवहार करणे गैर असून असे झाल्यास संबंधित खेळाडूस / संघास स्पर्धेतून बाद केल्या जाईल.

८. प्रत्येक स्पर्धेसाठी पंचाचा निर्णय अंतिम राहील. पंचाच्या निर्णयावर त्याच्याशी वाद घालू नये.

९. पंचांच्या निर्णयाला प्रभावित करण्यासाठी अनुचित व्यवहार करण्यात येऊ नये.

१०. पंचाच्या परवानगी घेऊनच खेळ चालू असताना मैदानाबाहेर किंवा आत जाणे बंधनकारक राहील.

**११.** प्रत्येक खेळाडूनी ड्रेस कोड सह सहभागी होणे आवश्यक आहे. **तसेच प्रत्येक संघास प्रथम राज्यस्तरिय स्पर्धे साठी निर्देशित केलेला ड्रेस कोड लागू राहील.**

१२. प्रत्येक खेळाडू स्वत:च्या जबाबदारीवर स्पर्धेमध्ये भाग घेतील. याबाबतचे विहीत नमुन्यातील हमीपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहिल. सदर हमीपत्र संकेतस्थळावर देणेत आलेले आहे.

**१३. खेळांचे सर्वसाधारण नियम खालील प्रमाणे देणेत आलेले असुन खेळनिहाय काही नियमबदल असलेस सामने सुरु करणेपुर्वी पंचांकडुन सर्व संघांना अवगत करणेत येईल.**

# महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग,

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**

**क्रिडा स्पर्धा सन २०१७-१८**

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे- ४११०११.

ई-मेल : edmkvdc_pune@wrd.maharashtra.gov.in, दूरध्वनी : ०२०-२६१३५२६३.

sesipcsatara@rediffmail.com, sipcsports@gmail.com दूरध्वनी : ०२१६२-२४४६५४.


## जलसंपदा विभाग, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम -२०१७-१८

**स्थळ : शाहू क्रिडा संकुल, एस.टी.स्टँड शेजारी सातारा.**

**राज्यस्तरीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा -**

सर्वसाधारण नियमावली :

१. प्रत्येक डाव हा 10 षटकांचा असेल.

२. प्रत्येक डावातील 10 षटके ही 50 मिनिटात संपविणे प्रत्येक संघास बंधनकारक असेल.

३. प्रत्येक सामना हा बाद पध्दतीने खेळण्यात येईल. विजेता संघ हा पुढे जाईल.

४. प्रत्येक संघास दिलेल्या वेळेच्या आधी साधारण 15 मिनिटे हजर राहून संघनायकाने आयोजित समितीच्या सदस्यांकडे नोंदणी करावी. अन्यथा संघ बाद करण्यात येऊन पुढील संघास पुढे चाल देण्यात येईल.

५. प्रत्येक क्रिकेट सामण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट प्रमाणे नियम आहेत. फक्त LBW OUT हा प्रकार राहणार नाही.

६. प्रत्येक गोलंदाजास प्रत्येकी दोन (2) षटकांची मर्यादा राहील.

७. पंचाचा निर्णय हा अंतिम राहील. पंचाच्या निर्णयावर अपील करता येणार नाही. व संघाने पंचाबरोबर वाद घातल्यास संघ बाद करण्यात येईल.

८. एखादी मॅच बरोबरीत सुटली तर 1 ओव्हरची (Super Over) नव्याने मॅच खेळण्यात येईल व त्यातून विजेता संघ निवडण्यात येईल.

९. सामन्याच्या पहिल्या तीन षटकांमध्ये 30 यार्ड परिघाबाहेर जास्तीत जास्त दोन (2) क्षेत्ररक्षक उभे करण्यास परवानगी असेल. उर्वरित सात षटकांमध्ये जास्तीत जास्त पाच (5) क्षेत्ररक्षक 30 यार्डच्या परिघाबाहेर उभे करण्यास परवानगी असेल.

# महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग,

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**

**क्रिडा स्पर्धा सन २०१७-१८**

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे- ४११०११.

ई-मेल : edmkvdc_pune@wrd.maharashtra.gov.in, दूरध्वनी : ०२०-२६१३५२६३.

sesipcsatara@rediffmail.com, sipcsports@gmail.com दूरध्वनी : ०२१६२-२४४६५४.


---

## जलसंपदा विभाग, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम -२०१७-१८

**स्थळ : शाहू क्रिडा संकुल, एस.टी.स्टँड शेजारी सातारा.**

**राज्यस्तरीय व्हॉलीबॉल (पासिंग) स्पर्धा -**

सर्वसाधारण नियमावली :

१. संघात प्रत्यक्ष खेळाडू संख्या 6 राहील आणि राखीव 6 असतील.

२. टॉस करुनच सर्व्हिस करणे आवश्यक, सर्व्हिस करताना लाईन टच ग्राहय धरला जाणार नाही.

३. नेटमन या खेळाडूने एका हाताने किंवा दोन्ही हाताने नेट काढणे, सदर नेट मधून बॉल काढल्यानंतर मागच्या खेळाडूने पुढे पास करणे.

४. समोरच्या संघाने पास करुन दिलेला बॉल दुसऱ्या संघाच्या खेळाडूने फिंगरिंग केल्यास ग्राहय धरण्यात येईल.

५. एक सामना प्रत्येकी 25 गुणाचे 2 तथा अंतिम सेट 15 गुणांचा असेल.

६. दोन्ही संघाने अंतिम गुण समान झाल्यास सलग दोन गुण होणे आवश्यक आहे.

# महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग,

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**

**क्रिडा स्पर्धा सन २०१७-१८**

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे- ४११०११.

ई-मेल : edmkvdc_pune@wrd.maharashtra.gov.in, दूरध्वनी : ०२०-२६१३५२६३.

sesipcsatara@rediffmail.com, sipcsports@gmail.com दूरध्वनी : ०२१६२-२४४६५४.


## जलसंपदा विभाग, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम -२०१७-१८

**स्थळ : शाहू क्रिडा संकुल, एस.टी.स्टँड शेजारी सातारा.**

**राज्यस्तरीय व्हॉलीबॉल (शुटींग) स्पर्धा -**

सर्वसाधारण नियमावली :

१. संघात प्रत्यक्ष खेळाडू संख्या 7 राहील आणि राखीव 5 असतील.

२. टॉस करुनच सर्व्हिस करणे आवश्यक, सर्व्हिस करताना लाईन टच ग्राहय धरला जाणार नाही.

३. नेटमन या खेळाडूने एका हाताने किंवा दोन्ही हाताने नेट काढणे, सदर नेट मधून बॉल काढल्यानंतर मागच्या खेळाडूने पुढे पास करणे.

४. दोन्ही संघाने अंतिम गुण समान झाल्यास दोन गुणांचा फ़रक होणे आवश्यक आहे.

५. तसेच शुटींग बॉल फ़ेडरेशन चे सर्व नियम लागु होतील.

# महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग,

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**

**क्रिडा स्पर्धा सन २०१७-१८**

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे- ४११०११.

ई-मेल : edmkvdc_pune@wrd.maharashtra.gov.in, दूरध्वनी : ०२०-२६१३५२६३.

sesipcsatara@rediffmail.com, sipcsports@gmail.com दूरध्वनी : ०२१६२-२४४६५४.


## जलसंपदा विभाग, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम -२०१७-१८

**स्थळ : शाहू क्रिडा संकुल, एस.टी.स्टँड शेजारी सातारा.**

**राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धा -**

सर्वसाधारण नियमावली :

१. Lots will held of KNOCK-OUT System.

२. Each match will be of ३ sets of ११ points.

३. Rule applicable for matches as per TTFI (Table Tennis Federation India)

४. Players are requested to carry Racket, Shoe & Kit at his own cost.

५. Matches will be played in categories as Mens/Women Single, Doubles & Mix.

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे- ४११०११.

ई-मेल : edmkvdc_pune@wrd.maharashtra.gov.in, दूरध्वनी : ०२०-२६१३५२६३.

sesipcsatara@rediffmail.com, sipcsports@gmail.com दूरध्वनी : ०२१६२-२४४६५४.


## जलसंपदा विभाग, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम -२०१७-१८

**स्थळ : शाहू क्रिडा संकुल, एस.टी.स्टँड शेजारी सातारा.**

**राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धा -**

सर्वसाधारण नियमावली :

१. बॅडमिंटन स्पर्धा योनेक्स नायलॉन ३५० शटलवर होईल.

२. बाद फ़ेरी तील सामने १५ पॉईंटची असेल.

३. संघ व खेळाडू यांनी सामन्याच्या वेळेआधी अर्धा तास हजर राहणे आवश्यक आहे व हजर असल्याची सुचना सामना समिती सदस्यास देणे बंधनकारक आहे.

४. सर्व खेळाडूंनी आपले कार्यालयाचे मुळ ओळखपत्र व ओळखपत्राची साक्षांकित झेरॉक्स प्रत देणे बंधनकारक आहे.

५. स्पर्धेबाबतचे सर्व अधिकार सामना समितीस राहतील.

६. सर्व खेळाडूंनी मैदानावर शिस्तीचे पालन करणे आवश्यक आहे.

७. स्पर्धा पुरुष/ महिला एकेरी, दुहेरी व मिश्र दुहेरी प्रकाराने खेळविले जातील.

८. मागील वर्षीप्रमाणेच एकेरी स्पर्धे साठी प्रत्येक महामंडळ/संघाकडुन २ खेळाडु तसेच दुहेरी व मिश्र प्रकारामधे फ़क्त १ संघाची नावे कळवावीत.

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे- ४११०११.

ई-मेल : edmkvdc_pune@wrd.maharashtra.gov.in, दूरध्वनी : ०२०-२६१३५२६३.

sesipcsatara@rediffmail.com, sipcsports@gmail.com दूरध्वनी : ०२१६२-२४४६५४.


---

## जलसंपदा विभाग, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम -२०१७-१८

**स्थळ : शाहू क्रिडा संकुल, एस.टी.स्टँड शेजारी सातारा.**

**राज्यस्तरीय कॅरम स्पर्धा -**

१. स्पर्धा एकेरी, दुहेरी (महिला, पुरुष) व मिश्र दुहेरी प्रकाराने खेळविले जातील.

२. बाद फेरी मधील सामने प्रत्येकी ५ /६ डावाचे राहतील वा त्यामधील अधिक गुण मिळवणारे खेळाडू विजयी राहतील.

३. मागील वर्षीप्रमाणेच एकेरी स्पर्धे साठी प्रत्येक महामंडळ/संघाकडुन २ खेळाडु तसेच दुहेरी व मिश्र प्रकारामधे फ़क्त १ संघाची नावे कळवावीत.

४. इतर नियम सामन्यांचे वेळीच सांगणेत येतील.

# महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग,

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**

**क्रिडा स्पर्धा सन २०१७-१८**

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे- ४११०११.

ई-मेल : edmkvdc_pune@wrd.maharashtra.gov.in, दूरध्वनी : ०२०-२६१३५२६३.

sesipcsatara@rediffmail.com, sipcsports@gmail.com दूरध्वनी : ०२१६२-२४४६५४.


---

# जलसंपदा विभाग, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम -२०१७-१८

**स्थळ : शाहू क्रिडा संकुल, एस.टी.स्टँड शेजारी सातारा.**

**राज्यस्तरीय जलतरण स्पर्धा -**

सर्वसाधारण नियमावली :

१. There are two groups such as Men & Women irrespective of age group.

२. List of events to be held are as follows.

   a) ५०/१०० Meter free style

   b) ५०/१०० Meter back stoke

   c) ५०/१०० Meter Breast stroke

३. Two men & one women participant shall be nominated from each corporation for each event.

४. Any event in which less than ३ competitors are participation will be cancelled.

५. There will be no finals. First three best timings from all hits will be taken into account.

६. Competitors will take part in the swimming competition at their own risk.

७. Participants should carry their own accessories required for swimming event.

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे- ४११०११.

ई-मेल : edmkvdc_pune@wrd.maharashtra.gov.in, दूरध्वनी : ०२०-२६१३५२६३.

sesipcsatara@rediffmail.com, sipcsports@gmail.com दूरध्वनी : ०२१६२-२४४६५४.


## जलसंपदा विभाग, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम -२०१७-१८

**स्थळ : शाहू क्रिडा संकुल, एस.टी.स्टँड शेजारी सातारा.**

**राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा -**

सर्वसाधारण नियमावली :

कबड्डी खेळ करण्यापूर्वी नाणेफेक केली जाते. नाणेफेक जिंकणारासंघ अंगण किंवा यापैकी एकाची निवड करतो. दुसऱ्या डावात अंगण बदलून अगोदर असतील तेवढेच खेळाडू घेऊन डाव सुरु करतात. त्यावेळी प्रथम ज्या संघाने चढाई केलेली नसते तो संघ चढाई करतो.

1. चढाई करणाऱ्या खेळाडूने कबड्डी हा उच्चार स्पष्टपणे आणि सलग केला पाहिजे.
2. चढाई करणाऱ्याने मध्यरेषा ओलांडण्यापूर्वी दम घालण्यास सुरुवात करावी तसे न आढल्यास पंचांनी विरुध्द संघाला चढाईची संधी द्यावी.
3. खेळ चालू असताना खेळाडूचा कोणताही भाग अंतिम मर्यादेवाहेर जाऊ नये. तसा गेल्यास तो बाद ठरवला जाईल, पंरतू झटापटीच्या वेळी तसे झाल्यास तो खेळाडू बाद नसतो. अशा वेळेस शरीराचा कोणताही भाग आत असला तरी चालतो.
4. झटपट सुरु झाल्यास राखीव क्षेत्राच्या क्रीडाक्षेत्रात समावेश होतो. झटपट संपल्यावर खेळाडूंनी आपापल्या क्षेत्रात परत जाताना राखीव क्षेत्राचा उपयोग करता येतो.
5. खेळ चालू असताना खेळाडू अंतिम रेषेबाहेर गेल्यास बाद ठरवल्या जातो.
6. चढाई करणारा आपल्या अंगणात गेल्यावर अथवा बाद णाल्यानंतर प्रतिपक्षाने 5 सेकंदात आपला खेळाडू चढाईसाठी पाठवावा.
7. चढाई करणारा आक्रमक खेळाडू बचाव करणाऱ्या खेळाडूला स्पर्श करुन आपल्या अंगणात परत जात असताना त्याला पाठलाग करता येईल, पंरतु चढाई करणारा पकडीतून सुटून जात असेल, अशा वेळी मात्र त्याचा पाठलाग करता येईल. परंतू चढाई करणारा पकडीतून सुटून जात असेल. अशा वेळी मात्र त्याचा पाठलाग करता येणार नाही.
8. चढाई करणाऱ्या खेळाडूविरुध्द अंगणात दम गेल्यास तो बाद ठरविला जाईल.
9. चढाई करणारा बचाव करणाऱ्या एक किंवा अधिक खेळाडूंना केवळ स्पर्श करुन जात असेल तर त्याचा पाठलाग करता येईल.
10. एकाच वेळी एकापेक्षा जास्त खेळाडूंनी चढाई केल्यास ती ग्राहय न मानता प्रतिस्पर्धी संघास चढाईची संधी दिली जाते.

11. वारंवार सूचना देऊन एकापेक्षा जास्त खेळाडू चढाईस जात असतील तर पंचांनी प्रथम गेलेल्या खेळाडूखेरीज बाकी सर्व खेळाडूंना बाद ठरवावे.
12. चढाई पूर्ण होईपर्यंत म्हणजेच चढाई करणारा आपल्या अंगणात जाईपर्यंत बचाव करणाऱ्या खेळाडूंपैकी कुणीही मध्यरेषा ओलांडू नये तसे केल्यास त्या खेळाडूला बाद दिले जाईल.
13. चढाई सुरु करताना बचाव करणा-या खेळाडूने मध्यरेषेला स्पर्श करुन त्या चढाई करणाऱ्यास पकडले अथवा मदत केली तर बचाव करणारा बाद होईल.
14. जो संघ लोन करेल त्या संघास दोन गुण मिळतात. लोन झाल्यास दहा सेकंदात सर्व संघ परत मैदानात आला नाही, तर प्रतिपक्षास एक गुण द्यावा. तसे करुनही जर संघ मैदानात येत नसेल, तर तो प्रत्येक पाच सेकंदाला एक या प्रमाणे सामन्याचा वेळ संपेपर्यंत गुण देत राहतील.
15. वारंवार पाळी नसताना एखादा खेळाडू चढाई जात असेल तर प्रतिस्पर्धी संघास एक गुण द्यावा.
16. प्रतिपक्षाचा एक खेळाडू बाद झाल्यास एक खेळाडू आत येतो.
17. पंच किंवा सरपंचाने एखादा संघाला अवांतर गुण दिल्यास फक्त गुण मिळतात,परंतु त्याचे बाद झालेले खेळाडू उठू शकत नाहीत.
18. कोणत्याही अडथळयाने सामना बंद पडला व तो 20 मी. च्या आत सुरु झाल्यास सामना उरलेल्या वेळातच खेळाडू व त्याच गुणसंख्येवर खेळवावा. मात्र त्यानंतर सुरु होत असल्यास सामना सुरुवातीपासून खेळवावा.
19. निलंबित किंवा बडतर्फ खेळाडूंसाठी बदली खेळाडू घेता येणार नाही. तसेच निलंबित वा बडतर्फ करण्याने कमी झालेल्या खेळाडूंची संख्या असताना बोनस रेषेचा नियम लागू होईल. तसेच लोन झाल्यास कमी असलेल्या खेळाडूच्या संख्येइतके गुण, अधिक दोन गुण दिले जातील.

**चूका (Faults)**

1. चढाई करणाऱ्याचे तोंड बंद करणे तसेच गळा दाबून त्याचा श्वास जबरदस्ती थांबविण्याचा प्रयत्न करणे.
2. कोणत्याही प्रकारे हिंसात्मक खेळ खेळणे.
3. विरोधी खेळाडूद्वारे चढाई करणाऱ्याला कैची मारुन पकडणे.
4. क्रीडा क्षेत्राच्या बाहेरुन एखादा खेळाडू अथवा कोचद्वारा कोचिंक करणे.

   या स्थितीमध्ये पंच कार्डाचा उपयोग करतात ज्याचा प्रयोग या प्रकारे होतो.

   - **हिरवे कार्ड : चेतावणी**
   - **पिवळे कार्ड : दोन मिनिटांकरिता सामन्यातून अस्थाई निलंबित.**
   - **लाल कार्ड : सामन्यातून किंवा स्पर्धेतून निलंबित.**

# महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग,

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**

**क्रिडा स्पर्धा सन २०१७-१८**

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे- ४११०११.

ई-मेल : edmkvdc_pune@wrd.maharashtra.gov.in, दूरध्वनी : ०२०-२६१३५२६३.

sesipcsatara@rediffmail.com, sipcsports@gmail.com दूरध्वनी : ०२१६२-२४४६५४.


---

## जलसंपदा विभाग, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम -२०१७-१८

**स्थळ : शाहू क्रिडा संकुल, एस.टी.स्टँड शेजारी सातारा.**

**राज्यस्तरीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा (महिला खेळाडू) -**

सर्वसाधारण नियमावली :

१. क्रिकेट सामन्यामध्ये सर्व सामने ८ षटकाचे रहातील. अंतिम सामना १० षटकांचा राहील.

२. सामन्यामध्ये ११ खेळाडू असतील.

३. क्रिकेटच्या स्पर्धा टेनिस बॉलने घेण्यात येतील.

४. स्पर्धेमध्ये ओव्हर आर्म रनअप न घेता बॉलिंग करणे आवश्यक आहे.

५. स्पर्धा हाफ पीच व मैदान ३० यार्ड चे अशा खेळवल्या जातील.

६. प्रत्येक संघाने ड्रेस कोडसह संघ मैदानात उतरावा.

७. सर्व आंतरराष्ट्रीय नियम सामन्याला लागू राहतील. (L.B.W.व्यतिरिक्त)

८. प्रत्येक सामन्यावेळी क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाकडून कमीत कमी चार गोलंदाजांनी गोलंदाजी करणे आवश्यक आहे. (अंतिम सामन्यावेळी कमीत कमी ५ गोलंदाज)

९. प्रत्येक संघात जास्तीत जास्त १५ खेळाडूंचा समावेश असेल. निवड झालेल्या संघातील खेळाडूंना अंतिम सामन्यापर्यंत बदलता येणार नाही.

१०. सामन्याच्या वेळी सर्व खेळाडूंनी ओळखपत्र बाळगणे अनिवार्य आहे.

११. सर्व खेळाडूंनी क्रिकेटच्या ठराविक अनुशासनाने (Discipline) खेळ खेळावेत.

१२. सर्व सामने योग्य तऱ्हेने पास पडावेत या करीता जिल्हा क्रिकेट असोसिएशन या संस्थेचे पंच नेमण्यात आलेले आहेत. पंचाचा निर्णय अंतिम राहील. व कोणत्याही खेळाडूंनी पंचासोबत वाद घातल्यास त्यांच्या वर ताबतोब खेळातून निलंबनाची कारवाई केली जाईल.

१३. प्रत्येक खेळाडूंने स्पर्धा चालू होण्या अगोर विहित नमुन्यातील स्पर्धा प्रवेश आवेदन पत्र संबंधित अधिकाऱ्यांकडे जमा करणे बंधनकारक आहे.

# महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग,

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**

**क्रिडा स्पर्धा सन २०१७-१८**

कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, पुणे- ४११०११.

ई-मेल : edmkvdc_pune@wrd.maharashtra.gov.in, दूरध्वनी : ०२०-२६१३५२६३.

sesipcsatara@rediffmail.com, sipcsports@gmail.com दूरध्वनी : ०२१६२-२४४६५४.


## जलसंपदा विभाग, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम -२०१७-१८

**स्थळ : शाहू क्रिडा संकुल, एस.टी.स्टँड शेजारी सातारा.**

**राज्यस्तरीय कला व सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धा -**

सर्वसाधारण नियमावली :

१. प्रत्येक स्पर्धेसाठी नेमून दिलेल्या वेळेतच स्पर्धकाने आपली कला सादर करणे बंधनकारक असेल. दिलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ सादरीकरण चालू राहिल्यास संबंधितास स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल किंवा अशा प्रकरणी परिक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

२. सर्व नाट्य व एकपत्री / मिमिक्री स्पर्धासाठी सहभागी स्पर्धकांना सुचित करण्यात येते की, नाटकाचा / एकांकिकेचा विषय हा राजकीय अथवा सामाजिक, जात, वर्ण धार्मिक इत्यादी बाबतीत कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहित व भविष्यात याबाबत प्रश्न उदभवल्यास होणाऱ्या परिणामास सर्व संबंधित स्पर्धक कलाकार जवाबदार असतील याची गांर्भियाने नोंद घ्यावी.

# महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग,

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

## क्रिडा स्पर्धा सन २०१७-१८

## स्पर्धा प्रवेश आवेदन पत्र

१. खेळाचा प्रकार (√) करावे.

१) क्रिकेट [ ] २) कबड्डी [ ] ३) व्हॉलीबॉल [ ]

४) बॅडमिंटन : एकेरी [ ] दुहेरी [ ] मिश्र [ ]

५) कॅरम एकेरी [ ] दुहेरी [ ] मिश्र [ ]

६) टेबल टेनिस : एकेरी [ ] दुहेरी [ ] मिश्र [ ]

७) बुध्दीबळ [ ] ८) जलतरण [ ] ९) ॲथलेटिक्स :[ ]

- धावणे १०० मी. [ ]
- धावणे २०० मी. [ ]
- ४ X १०० मी. रिले [ ]
- धावणे ३००० मी. [ ]
- धावणे १०००० मी. [ ]
- लांब उडी [ ]
- थाळी फेक [ ]
- गोळा फेक [ ]
- भाला फेक [ ]

२. अधिकारी / कर्मचारी यांचे नांव :

३. पदनाम :

४. जन्मदिनांक :

५. कार्यालयाचे नाव मंडळ :

विभाग :

उपविभाग :

शाखा :

६. दूरध्वनी / मोबाईल क्रमांक एस.टी.डी. सह निवासी दूरध्वनी

७. संपर्काचा पत्ता :

मी ..................................................................................लिहून देतो / देते की, जलसंपदा विभागातंर्गत क्रिडा सामने व सांस्कृतिक कार्यक्रम २०१७-१८ मध्ये वरील क्रिडा प्रकारात मी सहभागी होत आहे. या क्रिडा प्रकारात सहभागी होण्यासाठी मी शारीरिकदृष्टया सक्षम असून मी स्वत:च्या जबाबदारीवर सहभागी होत आहे.

क्रिडा स्पर्धेदरम्यान संभवणाऱ्या अपघाताची जबाबदारी जलसंपदा विभागाची नसल्याची मला संयोजकांनी जाणीव करुन दिली असून त्यास माझी संम्मती आहे. स्पर्धे दरम्यान कायदा व सुव्यस्था राखण्यास माझ्याकडून कोणतीही बाधा पोहोचणार नाही याची मी दक्षता घेईल. पंचानी दिलेले निर्णय अंतिम असून ते मला / संघाला बंधनकारक असतील.

खेळाडूची स्वाक्षरी : ......................................................

नांव :......................................................

# महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग,

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

## क्रिडा स्पर्धा सन २०१७-१८

## स्पर्धा प्रवेश आवेदन पत्र

१. खेळाचा प्रकार (✓) करावे.

१) **नाटय एकांकिका** [ ] , एकपात्री [ ]

२) **गायन वैयक्तीक** : शास्त्रीय [ ] , उपशास्त्रीय [ ]

समुह गायन [ ]

३) **वादन वैयक्तीक** : शास्त्रीय [ ] , उपशास्त्रीय

४) **नृत्य वैयक्तीक** [ ], सामुहिक [ ]

५) **फोटोग्राफी** : धरण [ ], कालव्यावरील बांधकामे [ ] ,

निसर्ग [ ] , व्यक्तिचित्रे [ ]

२. अधिकारी / कर्मचारी यांचे नांव :

३. पदनाम :

४. जन्मदिनांक :

५. कार्यालयाचे नाव मंडळ :

विभाग :

उपविभाग :

शाखा :

६. दूरध्वनी / मोबाईल क्रमांक एस.टी.डी. सह निवासी दूरध्वनी

७. संपर्काचा पत्ता :

सर्व नाटय व एकपात्री / मिमिक्री / नाटकाचा / एकांकिकेचा विषय हा राजकीय अथवा सामाजिक, जात, वर्ण, धार्मिक इत्यादी बाबतीत कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहित, व भविष्यात प्रश्न उद्भवल्यास होणाऱ्या परिणामास मी / संघ जबाबदार असतील याची मला पूर्ण जाणिव आहे. पंचानी दिलेले निर्णय अंतिम असून ते मला / संघाला बंधनकारक असतील.

.

खेळाडूची/कलाकाराची स्वाक्षरी : ......................................................

नांव :......................................................